कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/कविवि/सूकेकेस्मृसंस/२०२१-२२/२२६१
दि. ३१/१२/२०२१

## कृपया प्रसिध्दीसाठी

देशातील नामांकित अशा संगीत समारोहामध्ये गणना होणारा व मागच्या ४० वर्षापासून आयोजित होत असलेला कला अकादमीचा प्रतिष्ठेचा ४१ वा सूरश्री केसरबाई केरकर संगीत समारोह यंदा दि. १४ ,१५ व १६ जानेवारी २०२२ या कालावधीत राजीव गांधी कला मंदिर, फोंडा येथे संपन्न होणार आहे. सदर महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवार दि. १४ जानेवारी रोजी सायं. ५.०० वा. गोवा राज्याचे कला व संस्कृती मंत्री तसेच कला अकादमीचे मान. अध्यक्ष श्री. गोविंद गावडे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

शुक्रवार दि. १४ जानेवारी रोजी उद्घाटन समारंभानंतर सायं. ५.१५ वा. स्थानिक युवा कलाकार रितिष्का वेर्णेकर यांचे शांस्त्रीय गायन होणार आहे. त्यानंतर सायं. ६.१५ वा. बरोडा स्थित पं. दीपक क्षीरसागर यांच्या शास्त्रीय स्लाइड गिटाराची मैफल होणार आहे. सायं. ७.४५ वा. पहिल्या दिवशीच्या सत्राची सांगता पुणे येथील प्रसिध्द गायिका आरती अंकलीकर टिकेकर यांच्या शांस्त्रीय गायनाच्या मैफलीने होणार आहे.

शनिवार दि. १५ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात १०.३० वा. मुंबई येथील युवा गायक कलाकार श्री. धनंजय हेगडे यांचे शास्त्रीय गायन होईल व तद्नंतर कोलकाता येथील प्रसिध्द शास्त्रीय गायक श्री. अर्षद अली खान व पुणे येथील युवा प्रतिभावंत सितारवादक शाकिर खान यांच्या शास्त्रीय गायन-सितार जुगलबंदिची मैफल होणार आहे.

शनिवार दि. १५ जानेवारी रोजी सायंकाळच्या सत्रास ४.०० वा. प्रारंभ होईल. यात गोमंतकीय युवा कलाकार श्री. सोनिक वेलिंगकर यांचे सोलो बासरी वादन होईल व त्यानंतर नवी दिल्ली स्थित प्रशांत मल्लीक व निशांत मल्लीक यांची धृपद गायनाची मैफल संपन्न होणार आहे. धृपद गायनाला जोडून बंगळूर येथील श्रीमती संगीता कट्टी कुलकर्णी यांचे शास्त्रीय गायन होईल. सायंकाळच्या सत्राची सांगता मुंबई येथील ख्यातनाम तबलावादक विद्वान श्री. योगेश साम्सी व त्यांचे प्रज्ञावंत शिष्य श्री. स्वप्नील भिसे व श्री. चंद्रशेखर गांधी यांच्या तबला त्रिकुटीजुगलबंदी (तबला ट्रीवो) मैफलीने होणार आहे.

रविवार दि. १६ जानेवारी रोजी सकाळी १०.३० वा गोमंतकीय युवा प्रतिभेचे गायक कलाकार श्री. नितेश सावंत यांच्या शास्त्रीय गायनाने सत्रास प्रारंभ होईल. त्यानंतर सकाळच्या सत्राची सांगता कोलकाता येथील प्रख्यात सरोदवादक पं. देबासिश भट्टाचार्या यांच्या सरोदवादनाच्या मैफलीने होणार आहे.

संगीत महोत्सवाच्या समारोप सत्रात सायंकाळी ४.०० वा. पुणे येथील प्रसिध्द गायिका श्रीमती मंजिरी असानारे केळकर यांचे शास्त्रीय गायन होईल. त्यानंतर सायंकाळी ५.१५ वा. नाशिक येथील प्रसिध्द गायक श्री. प्रसाद खापर्डे यांची शास्त्रीय गायनाची मैफल संपन्न होणार आहे. या मैफलीला जोडूनच धारवाड येथील श्रीमती ज्योती हेगडे यांची रुद्रवीणा वादनाची मैफल होणार आहे. केसरबाई केरकर संगीत समारोहाची सांगता कोलकाता येथील अंतरराष्ट्रीय ख्यातीचे ख्यातनाम शास्त्रीय गायक पं. अजोय चक्रवर्ती यांच्या शास्त्रीय गायनाच्या मैफलीने होणार आहे.

या संगीत महोत्सवात पं. योगेश साम्सी, ओजस आधिया, दयानिधेश कोसंबे, उदय कुलकर्णी, मयांक बेडेकर, अमर मोपकर, स्वप्निल मांद्रेकर, ऋषिकेश फडके, महेश वजे हे कलाकार तबल्यावर साथसंगत करतील तर पं. अजय जोगळेकर, राया कोरगांवकर, सुभाष फातार्फेकर, गुरुप्रसाद गांधी, दत्तराज सुर्लकर, प्रसाद गावस, दत्तराज म्हाळशी यांची संवादिनी साथसंगत लाभणार आहे. तसेच मृणाल मोहन उपाध्याय, पं. ज्ञानेश्वर देशमुख हे कलाकार पखवाजावर साथसंगत करणार आहेत. यंदाच्या या महोत्सवासाठी राजीव गांधी कला मंदिर, फोंडा यांचे आयोजनासाठी सहकार्य लाभले आहे.

महोत्सवातील कार्यक्रम सर्व रसिकांसाठी खुले असून कांही आसन व्यवस्था निमंत्रितासाठी राखून ठेवण्यात आली आहे. याची सर्व रसिकांनी नोंद घ्यावी व यंदाचा हा संगीत समारोह सर्वार्थाने यशस्वी करावा असे आवाहन कला अकादमीने केले आहे. कोविड-१९ ची सर्व मार्गदर्शक तत्वे पाळून या समारोहास प्रवेश दिला जाणार आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

सोबतः प्रमुख कलाकारांची प्रसिध्दीसाठी छायाचित्रे

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)